**DMK JAOLI BANK**

दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.

Azadi Ka Amrit Mahotsav

# सुवर्ण महोत्सवी वर्ष

# ४९ वा वार्षिक अहवाल 2021-2022



**Banking with Smart Ways**

# श्रध्दास्थान



बँकेचे संस्थापक

**परमपूज्य ह.भ.प.वै.दत्तात्रय महाराज कळंबे**

## स्फुर्तीस्थान



ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व बँकेचे मार्गदर्शक
**स्व.भिलारे गुरूजी**

# संचालक मंडळ

सन २०२२-२३ - सन २०२६-२७ (दि.१३/०७/२०२२ पासून)



श्री.विक्रम विजयकुमार भिलारे
अध्यक्ष



श्री.चंद्रकांत तानाजी दळवी
उपाध्यक्ष



श्री.चंद्रकांत रावसाहेब गावडे
संचालक



श्री.प्रकाश जगन्नाथ मस्कर
संचालक



श्री.योगेशराव हरिभाऊ गोळे
संचालक



श्री.अरूण बाबूराव सुर्वे
संचालक



श्री.संतोष रामचंद्र कळंबे
संचालक



श्री.प्रकाश उर्फ चंद्रकांत धोंडीराम कोकरे
संचालक



श्री.बाळासाहेब तुकाराम भालेघरे
संचालक



श्री.अजित काशिनाथ कळंबे
संचालक



श्री.विश्वनाथ ज्ञानदेव धनावडे
संचालक



श्री.रामचंद्र विठ्ठल चिकणे
संचालक



श्री.गणेश नामदेव भोसले
संचालक



श्री.विजय दगडू कदम
संचालक



श्री.चंद्रकांत नामदेव गवळी
संचालक



सौ.जयश्री वसंतराव मानकुमरे
संचालिका



सौ.उमिता शिवाजी रांजणे
संचालिका



श्री.प्रविण वसंत शिंदे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री.अशोक रामचंद्र चव्हाण
कर्मचारी प्रतिनिधी



श्री.ईश्वरदास दयाराम लालवाणी
मुख्य कार्यकारी अधिकारी
(दि.०६/०६/२०२२ पासून)

# संचालक मंडळ

(सन २०१५-१६ - सन २०२०-२१) दि.१२/०७/२०२२ पर्यंत


श्री. राजाराम शंकर ओंबळे
अध्यक्ष


श्री. भानुदास महादेव जाधव
उपाध्यक्ष


श्री.विक्रम विजयकुमार भिलारे
संचालक


श्री. चंद्रकांत रावसाहेब गावडे
संचालक


श्री. प्रकाश जगन्नाथ मस्कर
संचालक


श्री. हणमंत गणपत पवार
उपाध्यक्ष ( दि. २८/०४/२०२१ पर्यंत)


श्री. आनंदराव जोतिबा सपकाळ
संचालक


सौ. पवित्रा राजाराम परामणे
संचालिका


सीए.सौ.अस्मिता विजय धनावडे
संचालिका


श्री. प्रकाश उर्फ चंद्रकांत धोंडिराम कोकरे
संचालक


श्री. भरत राजाराम सपकाळ
संचालक


श्री. संतोष रामचंद्र कळंबे
संचालक


श्री. बजरंग कोंडीबा संकपाळ
संचालक


श्री. शिवाजी श्रीपती नवसरे
संचालक


श्री.मोहन ज्ञानदेव मानकुमरे
संचालक(२८/०४/२०२१ पर्यंत)


श्री.शांताराम श्रीपती आंग्रे
संचालक


श्री. श्रीरंग भागु सपकाळ
संचालक


ॲड.शिवाजीराव साहेबराव मर्ढेकर
स्वि.संचालक


श्री.चंद्रकांत सुदाम पवार
स्वि.संचालक


श्री.प्रविण वसंत शिंदे
कर्मचारी प्रतिनिधी


श्री.अशोक रामचंद्र चव्हाण
कर्मचारी प्रतिनिधी


श्री.तानाजी नारायणराव पवार
मुख्य सरव्यवस्थापक
(दि.३१/०७/२०२२ पर्यंत )


श्री. एस.रंगनाथन
मुख्य कार्यकारी अधिकारी
(दि.३०/११/२०२१ पर्यंत )

# व्यवस्थापन मंडळ

(Board of Management)

दि.२४/०६/२०२१ पासून दि.१२/०७.२०२२ पर्यंत



श्री. आनंदराव जोतिबा सपकाळ
अध्यक्ष



श्री. भानुदास महादेव जाधव
सदस्य



सी.ए.सौ.अस्मिता विजय धनावडे
सदस्य



श्री.विजय केशवराव मोकाशी
सदस्य



श्री.वसंत जिजाबा तरडे
सदस्य



सी.ए.श्री.यशराज मोहन मानकुमरे
सदस्य

DMK JAOLI BANK
दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.

## Attractive Special Deposits Schemes
at Your Doorstep...

### Dhanvarsh Special Deposit Scheme

Rate of Interest
**7.00% p.a**

- Date of Launching 13 June, 2022
- Period of the Deposit 999 Days
- Minimum Amount of Deposit 10000/-
- Lock in Period 99 Days
- Eligibility Criteria Bank Account Holder
- No Penalty on winthdrawals after lock-in Period
- Beneficial to Maximize Returns
- Date of Closure of the Scheme 31 December, 2022

### Shri Mangal Murti Special Deposit Scheme

Rate of Interest
**5.50% p.a**

- Date of Launching 30 August, 2022
- Period of the Deposit 333 Days
- Minimum Amount of Deposit 5000/-
- Lock in Period 30 Days
- To all General Public Co.op.Soc., Firms, Sr.Citizens Bank Staff.
- Date of Closure of the Scheme 30 September, 2022

# अध्यक्षांचे मनोगत



**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

आपणां सर्वांचे आराध्यदैवत व जावली तालुक्याचीच नव्हे तर अखंड महाराष्ट्र राज्याची अर्थवाहिनी असलेल्या आपल्या दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँकेचे संस्थापक, संतश्रेष्ठ गाडगे बाबांचे शिष्य **ह.भ.प. वै. दत्तात्रय महाराज कळंबे,** बँकेचे सातत्यपूर्ण मार्गदर्शक राहिलेले सातारा जिल्ह्याचे जेष्ठ नेते, थोर स्वातंत्र्य सेनानी **स्व. भिलारे गुरुजी (दादा),** महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार **स्व. यशवंतराव चव्हाण,** माथाडी कामगारांचे दैवत **स्व. आण्णासाहेब पाटील** यांच्या स्मृतींना अभिवादन करून बँकेच्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासद बंधु भगिनींचे बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने मी सर्वप्रथम हार्दिक स्वागत करतो.

आपल्या बँकेच्या सर्वांगीण विकासाकरिता सातत्यपूर्ण मार्गदर्शन करणारे **श्री. श्रीनिवास पाटील-खासदार सातारा, मा. श्रीमंत छ. उदयनराजे भोसले खासदार-राज्यसभा, मा. खा. श्री. आनंदरावजी अडसूळ (माजी केंद्रिय अर्थराज्यमंत्री व अध्यक्ष, को-ऑप बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई ) मा. श्री. शशिकांतजी शिंदे - माजी जलसंपदा मंत्री तसेच आमदार, विधान परिषद, मा. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले - आमदार, जावली-सातारा, मा. श्री. मकरंद पाटील (आबा) - आमदार वाई - महाबळेश्वर-खंडाळा, मा. श्री. नरेंद्र पाटील - सरचिटणीस, माथाडी कामगार युनियन, मा. श्री. सदाशिवभाऊ सपकाळ - माजी आमदार जावली व बँकेचे मार्गदर्शक श्री. वसंतराव मानकुमरे (भाऊ) - (माजी उपाध्यक्ष - जिल्हा परिषद सातारा, माजी संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा)** सहकार क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या विविध आर्थिक संस्था व त्यांचे सर्व पदाधिकारी, कामगार संघटना, शैक्षणिक व सामाजिक संस्था, बँकेबद्दल आत्मीयता असलेले बँकेचे असंख्य खातेदार, ठेवीदार, कर्जदार, सभासद, हितचिंतक व मान्यवरांनी केलेले अमूल्य मार्गदर्शन आणि त्यांच्याकडून लाभलेले सहकार्य यामुळेच आपल्या बँकेला अहवाल वर्षामध्ये बँकिंग व्यवसायामध्ये समाधानकारकपणे मार्गक्रमण करता आलेले आहे.

बँकेने आपला यशस्वी असा ४९ वर्षांचा कार्यकाळ संपवून नुकतेच दिनांक २० जुलै, २०२२ रोजी "सुवर्ण महोत्सवी"वर्षात पदार्पण केलेले आहे. जन - माणसांमध्ये **'महाराजांची बँक'** असा आपल्या बँकेचा सर्वार्थाने गौरव होत आहे. ४९ वर्षांच्या कार्यकाळात वेळोवेळी निर्माण झालेल्या विविध आवाहनांचा सामना करीत बँकेने सर्व आघाड्यांवर समाधानकारक प्रगती साधलेली असून सर्व

घटकांना अभिप्रेत असलेली संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढ साधलेली आहे. आपल्या बँकेला वेगळ्या अशा वैचारिक बैठकीचा वारसा लाभलेला असल्याने बँकेचे वेळोवेळी निवडून आलेले संचालक मंडळ सदस्य आणि अधिकारी – कर्मचारी वर्ग बँकेचा दैनंदिन कारभार हा अतिशय निःस्वार्थीपणे, सेवाभावी वृत्तीने आणि पारदर्शकरित्या करीत असतात. नुकतीच बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक अविरोध वातावरणात पार पडलेली आहे. संचालक मंडळाचे निवडणूकीत भाग घेतलेल्या अनेक सभासद बंधु – भगिनींनी सहकार्याची भूमिका स्विकारत बँकेच्या विद्यमान संचालक मंडळातील सदस्यांना या बँकेसाठी निःस्वार्थीपणे काम करण्याची संधी प्राप्त करून दिलेली आहे. त्यामुळे संचालक मंडळ निवडणूकीत सहकार्य प्रदान केलेल्या सर्व सभासद बंधू – भगिनींच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजत असून त्यांचे आभारही मानतो.

माहे मार्च ,२०१९ पासून संपूर्ण जग कोरोनाच्या प्रभावाखाली मार्गक्रमण करीत असल्याचे सर्वज्ञात आहे. अहवाल वर्षातही कोरोनाच्या नवीन व्हेरीएंटचा प्रभाव हा जागतिक आरोग्य, अर्थव्यवस्था, व्यापार – उद्योग व बँकिंग क्षेत्रावर प्रकर्षाने जाणवलेला असल्याने आपल्या देशाची अर्थव्यवस्था त्याचप्रमाणे बँकिंग व्यवसायाला एका वेगळ्या संक्रमणावस्थेतून मार्गक्रमण करावे लागलेले आहे. गत अहवाल वर्षाचे चौथ्या तिमाहीत रशिया – युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीमुळे निर्माण झालेल्या भौगोलिक तसेच राजकीय तणावांमुळे बहुतांश देशांच्या आर्थिक कामगिरीवर विपरीत स्वरुपाचे परिणाम झालेले होते, मात्र आपल्या देशाचा समाधानकारक विकास दर व परकीय गंगाजळीचा मुबलक साठा यांमुळे भारतीय अर्थव्यवस्था काही प्रमाणात सुस्थितीत राहिलेली आहे. गतवर्षी भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ८.३०% इतका राहिलेला आहे. सन २०२१–२२ या आर्थिक वर्षात आपल्या देशातील बँकिंग व्यवस्थेमध्ये तरलता मुलबक प्रमाणात राहिलेली आहे. चालू आर्थिक वर्षात माहे मे, २०२२ पासून भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो दरात १.४०% इतकी वाढ केलेली  असल्यामुळे बँकांनाही वेळोवेळी आपापले कर्जाचे व्याजदर वाढवावे लागलेले आहेत. मागणी आणि पुरवठ्याचे संतुलन आणि वाढत असलेली महागाई यांवर नियंत्रण प्रस्थापीत करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे अलिकडेच बँकांच्या रोखतेचे प्रमाण (Cash Reserve Ratio) ४% वरून ४.५०% इतके केलेले आहे. देशातील महागाईवर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक चालू आर्थिक वर्षात त्याचप्रमाणे २०२३ मध्ये कडक धोरणे अवलंबण्याची आणि त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या वाढीवर होण्याची शक्यता आहे. चालू आर्थिक वर्षात भारताचा विकासदर हा ७.७०% इतका राहील असे अनुमान अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलेले आहे. सन २०२३ मध्ये जी डी पी मध्ये आणखी घट होण्याची शक्यता असून व्याजदरांत होत असलेली वाढ, अनियमीत मान्सून आणि जागतिक स्तरावरील स्लो – डाऊन यांचा परिणाम हा  अर्थव्यवस्थेवर होणार आहे. त्यामुळे आगामी कालावधीतही बँकांची कर्जे महाग होणार असून ठेवींवरील व्याजाचे खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

अहवाल सालात सर्वसामान्य ग्राहक हा बचतीवरील अधिक व्याज परताव्यासाठी म्युच्युअल फंड, स्थावर मालमत्ता खरेदी आदी स्वरुपाचे गुंतवणूकींचे पर्याय निवडू लागलेला असल्याने ठेवी वाढीमध्ये आपल्या बँकेला समाधानकारक वाढ साधता आलेली नसून बँका – बँकांतर्गत असलेल्या कर्जावरील स्पर्धात्मक व्याजदरांमुळे सुरक्षीत स्वरुपाच्या कर्ज वितरणारही मर्यादा प्राप्त झालेल्या आहेत. बँकेने कर्ज वितरण करतांना प्रामुख्याने सुरक्षीत स्वरुपाच्या कर्ज वितरणावर भर दिलेला आहे. बँकेने अहवाल वर्षात अनुत्पादित कर्ज वसुलीचा नियोजनबद्ध कार्यक्रम राबवून प्रदिर्घ कालावधीपासून अनुत्पादित असलेली कर्जे वसूल करण्याचे प्रयत्न करून अनुत्पादित कर्जांवर काही प्रमाणात नियंत्रण प्रस्थापित केलेले आहे. अहवाल वर्षात बँकेने ग्राहकांभिमुख बँकिंग सेवा – सुविधा प्रदान करण्याचे धोरणांतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर केलेला आहे. त्याचप्रमाणे कर्मचारी वर्गाची कार्यक्षमता वाढविण्याचे प्रयत्न करून विविध स्वरुपाच्या महसूली खर्चांमध्ये बचत करण्याचे प्रयत्न साधलेले असून ठेवींवरील व्याज खर्चावर नियंत्रण प्रस्थापित केलेले आहे. आपल्या बँकेने आजच्या स्पर्धेच्या युगात डिजीटल बँकिंग व्यवहारांचे कार्यप्रणालीस सर्वोच्च प्राधान्य देत आपल्या व्यवसायाची व्याप्ती समाधानकारकपणे वाढविलेली आहे. बँकेने आपली आर्थिक क्षमता उत्तम प्रकारे सिद्ध करत ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे आर्थिक प्रगती साधलेली आहे.

(रूपये कोटीत)

| अ.क्र. | तपशील | ३१ मार्च, २०२१ अखेर | ३१ मार्च, २०२२ अखेर |
|---|---|---|---|
| १ | स्वनिधी | ११९.०३ | १३१.१६ |
| २. | ठेवी | ७८८.७९ | ७९३.९२ |
| ३. | कर्जे | ५२८.३० | ४९६.७६ |
| ४. | एकूण संमीश्र व्यवसाय | १३१७.०९ | १२९०.६८ |
| ५. | गुंतवणूक | १६६.७५ | २६५.१९ |
| ६. | खेळते भांडवल | ९८०.७४ | ९७२.६७ |
| ७. | निव्वळ नफा | (५.७९) | (१०.०८) |
| ८. | नक्त संपत्ती मूल्य | ५९.३४ | ४६.६४ |
| ९. | भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण | १३.७७% | १३.१८% |

माहे १२, जुलै, २०२२ पर्यंत कार्यरत असलेल्या बँकेच्या संचालक मंडळाद्वारे अहवाल वर्षात बँकेच्या विकासाच्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी आगामी कालावधीतही करण्याकरिता बँकेचे विद्यमान संचालक मंडळ त्याचप्रमाणे बँकेचे अधिकारी व कर्मचारी कटीबद्ध आहेत. आपल्या बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषांची अतिशय काटेकोरपणे अंमलबजावणी केलेली आहे. बँकेच्या मुख्यालयातील विविध विभाग आणि २४ शाखांचे माध्यमातून बँकेला नेहमी सर्व आघाड्यांवर अग्रभागी ठेवण्याचे प्रयत्न करण्यात येत असतात. बँकेच्या सेवक वर्गाचे अथक प्रयत्नांतून बँक व्यवस्थापनाने ठरविलेल्या ध्येय्य धोरणांनुसार व्यवसायात वाढ करून नफा क्षमता वाढविणे, आपला भांडवली पाया मजबूत करणे बाबत सर्वांचे सदैव प्रयत्न चालू असतात. बँकेच्या सद्य स्थितीबाबत विश्लेषण करताना, आपली बँक ही मजबूत अशा भांडवली पायावर सक्षमपणे मार्गक्रमण करीत असल्याची बाब अधोरेखित करणे गरजेचे आहे. बँकेच्या कार्यरत असलेल्या २४ शाखांचे माध्यमातून बँकेचा सद्या **१२९० कोटी** रुपयांचा संमिश्र व्यवसाय झालेला आहे. जागतिक तसेच देशांतर्गत अर्थव्यवस्थेमध्ये प्रस्थापित असलेल्या नकारात्मक परिस्थितीमुळे आपला बँकेच्या आर्थिक स्थितीवरही काही प्रमाणात परिणाम झालेले दिसून येत असून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांनुसार बँकेची असलेली अनुत्पादीत कर्जे, गुंतवणूकी यांवर मोठ्या प्रमाणांत तरतूदी कराव्या लागलेल्या असल्यामुळे अहवाल वर्षातील नफा क्षमतेवर परिणाम झालेला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आगामी कालावधीत प्राप्त परिस्थितीवर मात करून आपले आर्थिक स्थैर्य अधिक मजबूत करण्याचे सर्वंकष धोरण विद्यमान संचालक मंडळाद्वारे निश्चित करण्यात आलेले आहे. बँकिंग व्यवसायात निर्माण झालेली आव्हाने, आपल्या बँकेची सद्य आर्थिक स्थिती आणि भविष्यातील गतीमान वाटचालीसाठी आखावयाची ध्येय्य धोरणे याबाबतचे पुढील पाच वर्षांकरिता सर्वंकष विकासाचे " **व्हिजन डॉक्युमेंट** " तयार करण्यात आलेले आहे. आपणां सर्वांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करून बँकेच्या सर्वच घटकांना एका वेगळ्या प्रेरणेद्वारे बँकेच्या कामकाजासाठी आणि प्रगतीसाठी झोकून देऊन काम करण्यास प्रवृत्त करणे हा बँकेचा एकमेव हेतू असून आपणा सर्वांचे सहकार्य व अमूल्य असे योगदान यांमुळे ही ध्येय – धोरणे राबविण्यात बँक यशस्वी होईल याची आम्हाला खात्री आहे.

यापुढील कालावधीमध्ये बँकांच्या शाखा कार्यालयांत प्रत्यक्ष हजर राहून बँकिंग व्यवहार करण्याकडे ग्राहक वर्गाचा कल हा कमी होत जाणार आहे. त्यामुळे आपल्या बँकेने डिजीटल पेमेंट बाबत पुढाकार घेऊन विविध डिलीव्हरी चॅनल्स कार्यान्वीत केलेले आहेत. सदर स्वरुपाच्या सेवांमुळे आपली बँक ग्राहकांचा उत्तम प्रकारे विश्वास संपादीत करीत असून आगामी कालावधीत आपल्या व्यवसाय वाढीकरिता सदर बाबी या अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. अलिकडे बँकिंग व्यवहारांमध्ये सायबर गुन्ह्यांची व्याप्ती वाढत चाललेली आहे. सायबर सुरक्षीतता आणि त्यामधील संभाव्य धोके कमी करण्याकरिता बँकांना मोठ्या प्रमाणात यंत्रणा कार्यान्वित

करावी लागत असून सदर बाबींकरिता मोठ्या प्रमाणात खर्च होत असतात. त्यामुळे आपल्या बँकेमार्फत डिजीटल व्यवहार करतांना बँक ग्राहकांनी सर्वतोपरी दक्षता घेणे अभिप्रेत आहे. आगामी कालावधीत आपली बँक ग्राहक वर्गाचे समाधान आणि बँकेवरील विश्वास यामध्ये वृद्धी करण्याकरिता कटीबद्ध राहणार असल्याबाबत मी या ठिकाणी ग्वाही देतो.

चालू आर्थिक वर्ष हे आपल्या बँकेच्या यशस्वी कारकिर्दीचे **"सुवर्ण महोत्सवी वर्ष"** असल्यामुळे आपल्या बँकेची सहकारी बँकिंग व्यवसायामध्ये असलेली एक आगळी – वेगळी ओळख कायम राखण्याकरिता वर्षभर विविध स्वरुपाचे कार्यक्रम आयोजित करण्याबाबत बँकेच्या संचालक मंडळाचा मानस आहे. कष्टकरी कामगार वर्गाचा आर्थिक स्तर उंचावण्याकरिता ह.भ.प. वै. दत्तात्रय महाराज कळंबे या एका संत महात्म्याने स्थापन केलेली आपली **दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक** कॉर्पोरेट जगत, आधुनिक पिढीचे नेतृत्व करणारे भारतीय युवक – युवती यांच्या बँकिंग गरजा पूर्ण करणारी **नव्या युगाची बँक** म्हणून सक्षमपणे कार्यरत राहण्यासाठी बँकेने गतीमान विकासाचे ध्येय – धोरण आखलेले आहे. या ध्येय्य – धोरणांची अंमलबजावणी करण्याकरिता बँकेचे संचालक मंडळ सदस्य बँकेचा सेवक वर्ग पूर्ण क्षमतेने तयार असून आपणां सर्वांच्या सहकार्याचीही अपेक्षा आहे. आपणां सर्वांचे आपल्या बँकेवर अतीशय प्रेम आणि जिव्हाळा आहे, तो याही पुढे वृद्धींगत राहील याची मला खात्री आहे. आगामी कालावधीत आपल्या बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्याना आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास हा होतच राहणार आहे. त्यामुळे नागरी सहकारी बँकींग व्यवसायांमध्ये बँकेचा नावलौकिक कायम राखण्यासाठी आपणा सर्वांच्या सातत्यपूर्ण योगदानाकरिता नम्र विनंती करतो !!!

**जय हिंद, जय सहकार**

आपला स्नेहांकित
**श्री. विक्रम विजयकुमार भिलारे**

## प्रशासन

**श्री.एस.रंगनाथन**
मुख्य कार्यकारी अधिकारी
(दि. ३०/११/२०२१ पर्यंत)

**श्री.तानाजी नारायणराव पवार**
मुख्य सरव्यवस्थापक (दि. ३१/७/२०२२ पर्यंत)

**श्री.दत्ता नारायण कळंबे**
सरव्यवस्थापक (दि. ३१/३/२०२२ पर्यंत)

**श्री.गोविंद कृष्णा जाधव**
उपसरव्यवस्थापक (दि. १८/१/२०२२ पासून)

## सहाय्यक सरव्यस्थापक

**श्री नामदेव शंकर बांदल**
(दि. १८/१/२०२२ पासून)

**श्री अनिल गुलाबराव सणस**
(दि. १८/१/२०२२ पासून)

**श्री संजय साहेबराव सकपाळ**
(दि. ८/२/२०२२ पासून)

---

## वैधानिक लेखापरिक्षक

**यु.जी.देवी अ‍ॅण्ड कंपनी (चार्टड अकौंटंट)**

---

## टॅक्स ऑडिटर्स

**मे.विंदु अ‍ॅन्ड असोसिएट्स**
चार्टर्ड अकौंटंट

## जी एस टी ऑडिटर्स

**मे पायल गाडा अ‍ॅण्ड असोसिएटस्,**
चार्टर्ड अकौंटंट

## समावर्ती लेखापरिक्षक

**मे.वर्षा अमोल काळे अ‍ॅण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.एम.के.टी.एस.के.अ‍ॅण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.अभिजीत शिंदे अ‍ॅण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे जी.एस.इंगळे अ‍ॅण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.अमित वर्मा अ‍ॅण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.अमित निकम अ‍ॅण्ड असोसिएटस्,**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.विवेक शहा अ‍ॅण्ड कंपनी,**
चार्टर्ड अकौंटंट

## स्टॉक ऑडीटर्स

**मे.बी.आर.सावंत अ‍ॅण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.नितीन दळवी अ‍ॅण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.तेजस नाडकर्णी अ‍ॅण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.मार्क अ‍ॅण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट
(IS Auditors)

## बँकर्स

| | | | |
|---|---|---|---|
| रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. | मुंबई जिल्हा मध्य सह बँक लि. | सातारा जिल्हा मध्य.सह.बँक लि. |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | बँक ऑफ महाराष्ट्र | आय डी बी आय बँक | आय सी आय सी आय बँक लि. |
| बँक ऑफ बडोदा | एच डी एफ सी बँक लि. | येस बँक लि. | युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि. |

## कॉर्पोरेट एजन्सीज

विमा व्यवसाय : आय सी आय सी आय लोंबार्ड इन्शुरंन्स कं.लि., कोटक महिंद्रा लाईफ इन्शुरंस कं.लि.(KLI),युनिव्हर्सल सोम्फो जनरल इन्शुरंन्स कंपनी, रिलायन्स जनरल इन्शुरंन्स कंपनी, आदित्य बिर्ला सनलाईफ इन्शुरंस कं.लि.
पॅनकार्ड : यु टी आय इन्फ्रास्ट्रक्चर अ‍ॅन्ड सर्व्हीसेस लि., (UTIITSL)

**DMK JAOLI BANK**
**दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.**

(नोंदणी क्रं. बी. ओ. एम./बी.एन.के./ १२७ ऑफ १९७३)
**प्रशासकीय कार्यालय :** ४१८/२०/२२, मौलाना आझाद रोड, मुंबई.- ४०० ००४. दुरध्वनी क्र.: +९१ २२-२३८६२३५२/२३८२२७७७
Website : www.jaolibank.in Email : hoadmin@jaolibank.in, hoscr@jaolibank.in

# ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरीता)**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **रविवार दि. १८/०९/२०२२ रोजी सकाळी ठिक १०.३० वा. डॉ.अँटोनियो डी-सिल्व्हा हायस्कुल, एस के बोले रोड, कबुतखान्याजवळ, दादर (प), मुंबई - ४०० ०२८** येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे वाचन करून त्यास स्विकृती देणे.
३. वैधानिक लेखा-परिक्षकांचा सन २०२१-२२ चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरूस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे,
४. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५. माहे ३१ मार्च, २०२२ अखेर बँकेचे संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना अदा करण्यात आलेल्या कर्जाची नोंद घेणे.
६. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सभासदांचे प्रशिक्षणाकरीता राबविलेले कार्यक्रम व आगामी कालावधितील धोरण यांचा आढावा घेणे.
७. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ४९ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणीत केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणे बाकी रक्कम संबंधीत कर्जदारांकडुन करावयाच्या वसुलीचे सर्व अधिकार अबाधीत ठेऊन निर्लेखन करण्यास मान्यता देणे.
८. ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापीत करणे.
९. मा.अध्यक्षांचे परवनगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

**विशेष सुचना :**

१. गणसंख्येपुर्ती अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजेच सकाळी ठीक ११.०० वा. सुरू होईल व त्या सभेच्या कामकाजाच्या वेळी गणसंख्यापूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरळीत होण्यासाठी ज्या सभासदांना विधायक स्वरूपात काही प्रश्न, सुचना मांडावयाच्या असतील अथवा बँकेच्या कामकाजासंबधी काही माहिती विचारावयाची असेल त्यांनी दि. ०९/०९/२०२२ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय, ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई - ४०० ००४ या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तपशीलवार लेखी स्वरूपात अथवा hoscr@jaolibank.in या ई-मेल आयडीवर पाठविल्यास त्याप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती, खुलासा सादर करणे सोयीचे होईल.
३. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सुचेननुसार सर्व सभासदांनी/खातेदारांनी के.वाय.सी.(K.Y.C.), बाबतच्या कागपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे किंवा वारसाची नोंद केलेली नाही त्यांनी या बाबींची त्वरीत पुर्तता करून घ्यावी, त्याकरीता संबंधीत शाखेत संपर्क करावा.
४. बँकेची माहे दि.३१ मार्च, २०२२ अखेरची आर्थिक पत्रके दि.११/०८/२०२२ रोजीचे दैनिक पुढारी या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. बँकेच्या सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेची वेबसाईटwww.jaolibank.com वर प्रसिध्द करण्यात आलेली असुन प्रत बँकेच्या सर्व शाखांत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संचालक मंडळाचे संमतीने
इश्वरदास दयाराम लालवाणी
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

मुंबई
दिनांक : ०२/०९/२०२२

# संचालक मंडळाचा अहवाल

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

आपल्या बँकेने वेळोवेळी विकसीत होत जाणारे तंत्रज्ञान, ग्राहकाभिमुखता, सामाजिक बांधिलकी यांना सर्वोच्च प्राधान्य देत अहवाल वर्षात व्यवसायामध्ये समाधानकारक प्रगती साधलेली असल्याने बँकेचा ३१ मार्च, २०२२ अखेरचा ताळेबंद, नफा–तोटा पत्रक, कॅश फ्लो बाबतचे माहितीपत्रक आणि वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल बँकेच्या संचालक मंडळाचे वतीने आपणांसमोर सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

**बँकेचे कार्यक्षेत्र व शाखा विस्तार** :

आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र असे असून बँकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्राहकांना विविध स्वरुपाच्या बँकिंग सेवा–सुविधा प्रदान करण्याचे सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. बँकेच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या २४ शाखा या कोअर–बँकिंग सोल्युशन कार्यप्रणालीअंतर्गत कार्यान्वित असून समस्त खातेदारांना बँकेच्या कोणत्याही शाखेमार्फत आपल्या खात्यावर विविध स्वरुपाच्या बँकिंग सेवा – सुविधा प्राप्त करून घेण्याच्या सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत.

**सभासद संख्या व भागभांडवल** :

गतवर्षी आपल्या बँकेचे ५०८३३ इतके नियमित तर २२९१ नाममात्र सभासद होते. अहवाल वर्षात ६८६ सभासद निवृत्त झाले तर १३८४ सभासद नव्याने दाखल झाले. वर्षाअखेर आपल्या बँकेचे ५१५३१ नियमित तर २३८३ इतके नाममात्र सभासद आहेत. या आकडेवारीवरून बँकेच्या सभासद संख्येत दिवसेंदिवस समाधानकारकरित्या वाढ होत असून बँकेच्या कामकाजातील सभासदांचा वाढता सहभाग हे बँकेच्या विकासाचे तसेच बँकेचा भांडवली पाया मजबूत असल्याचे द्योतक म्हणावे लागेल.

आपल्या बँकेच्या अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा ₹५०.०० कोटी असून गत वर्षी बँकेचे वसूल भाग भांडवल ₹२२.०४ कोटी इतके होते. अहवाल वर्षात निवृत्त झालेल्या सभासदांना ₹ ०.९७ कोटी भाग भांडवल परत करण्यात आले. बँकेकडे दाखल झालेल्या नविन सभासदांकडून ₹१.१९ कोटी इतके भाग भांडवल वसूल झाल्याने वर्षाअखेर आपल्या बँकेचे वसूल भाग भांडवल रु. २२.२५ कोटी इतके झालेले आहे. अहवाल वर्षाअखेर बँकेच्या भाग भांडवलात ०.९५% इतकी वाढ झालेली आहे.

**राखीव व इतर निधी** :

गतवर्षा अखेर आपल्या बँकेचे राखीव व इतर निधी ₹९६.९९ कोटी होते. अहवाल वर्षात सदर निधींमध्ये ₹ ११.९२ कोटीने वाढ होऊन वर्षाअखेर राखीव व इतर निधी ₹ १०८.९१ कोटी इतके झालेले आहेत. बँकेने प्राप्त केलेल्या नफ्यातून संचीत केलेल्या विविध स्वरुपाच्या निधींचे प्रमाणावर (Reserves) बँकेचे आर्थिक स्थैर्य अवलंबून असल्याने बँकेची नफा क्षमता वाढवून वैधानिक राखीव निधी व इतर निधीत वाढ करण्यासाठी अहवाल वर्षात सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आलेले आहेत. आपल्या बँकेचे भरीव स्वरुपातील राखीव व इतरनिधी हे आपली सक्षमता अधोरेखीत करीत आहेत.

अहवाल वर्षाअखेर आपल्या बँकेचे स्वनिधी (Owned Funds) ₹ १३१.१६ कोटी इतके असून नक्त संपत्ती मूल्य (Net Worth) ₹ ४६.६४ कोटी इतके आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्देशित केल्याप्रमाणे बँकांच्या पर्याप्त भांडवलाचे जोखमीत असलेल्या मालमत्तेशी (CRAR) प्रमाण हे ९% राखणे आवश्यक असतांना आपल्या बँकेने वर्षाअखेर हे प्रमाण १३.१८% इतके राखलेले आहे. बँकेने व्यवसायांतर्गत उद्भवणाऱ्या संभाव्य धोक्यांचे वेळोवेळी योग्यरित्या मूल्यांकन केलेले असून व्यवसायातील संभाव्य धोके टाळण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा निर्माण केलेली आहे.

**ठेवी :**

अहवाल वर्षातही बँकेने आपल्या जिंदगी – देयतांचे (Assets - Liability Management) सुयोग्य व्यवस्थापन केलेले आहे. अहवाल वर्षात ठेवींवरील व्याजदरांबाबत असलेल्या तीव्र स्वरुपाच्या स्पर्धेमुळेही ठेवी संकलनावर मर्यादा प्राप्त झालेल्या आहेत. इतर बँकांत असलेल्या ठेवींवरील व्याजदरांचा साकल्याने अभ्यास करून आपल्या बँक ग्राहकांना मुदत ठेवींवर अधिकाधिक प्रमाणात व्याजदर प्रदान करण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. गतवर्षी बँकेकडे सर्व प्रकारच्या ₹ ७८८.७९ कोटी इतक्या ठेवी होत्या. अहवाल वर्षात ठेवींमध्ये ₹ ५.१३ कोटीने वाढ होऊन त्या वर्षाअखेर ₹ ७९३.९२ कोटी इतक्या झालेल्या आहेत. अहवाल वर्षात आपल्या बँकेच्या ठेवींमध्ये ०.६५% ने वाढ झालेली आहे. आपल्या बँकेने अलिकडच्या कालावधीत मुदत ठेवींच्या आकर्षक व्याजदराच्या विविध ठेव योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. सर्व सभासद बंधूनी या योजनांचा लाभ घेण्याकरिता मी या ठिकाणी नम्र आवाहन करीत आहे.

**ठेवी विमा संरक्षण :**

बँकेमार्फत ठेवीदारांचे ₹ ५.०० लाख रकमेपर्यंतच्या सर्व प्रकारच्या ठेवींना ठेवी विमा व पतहमी निगम (DICGC) अंतर्गत विम्याचे संरक्षण देण्यात येते. बँकेने माहे ३० सप्टेंबर, २०२२ अखेरचा ठेवी विम्याचा हप्ता अदा केलेला आहे.

**बाहेरील कर्जे :**

खातेदारांचे समाशोधन व्यवहारांचे व्यवस्थापनाकरिता बँकेद्वारे शामराव विठ्ठल सहकारी बँकेकडून मुदत ठेवींचे तारणावर ₹. ५.०० कोटी रकमेचे अधिकर्ष कर्ज (Overdraft) मंजूर करण्यात आलेले आहे. वेळोवेळी कर्ज खात्यांतून उचललेल्या रकमांचा संपूर्ण भरणा केलेला असल्याने वर्षाअखेरीस अधिकर्ष कर्जाचे बँकेस दायित्व नाही.

**निधी व्यवस्थापनांतर्गत वैधानिक तरतूद :**

बँकिंग अधिनियम १९४९ चे कलम १८ आणि २४ मधील तरतूदींना अधिन राहून बँकेने अहवाल वर्षात वैधानिक स्वरुपात राखावयाची रोखता (CRR) व तरलता (SLR) याबाबतची कटाक्षाने पूर्तता केलेली आहे.

**गुंतवणूक :**

अहवाल वर्षात निधींचे व्यवस्थापनांतर्गत उपलब्ध असलेले अतिरिक्ति निधी कर्ज वाटपासाठी तसेच अधिकाधिक परतावा देणाऱ्या बँकांच्या मुदत ठेवीत गुंतविलेले आहेत. गतवर्षी आपल्या बँकेची तरलतेअंतर्गत केंद्र सरकारचे कर्ज रोखे व राज्य सरकारांचे कर्ज विकास रोखे यांमधील गुंतवणूक ₹ १६६.७५ कोटी होती तर बँकांतर्गत मुदत ठेवींतील गुंतवणूक ₹ १२३.६७ कोटी इतकी होती. अहवाल वर्षात केंद्र सरकारचे कर्ज रोखे व राज्यसरकारांचे कर्ज विकास रोखे यांमधील गुंतवणूक ₹ ९८.४४ कोटीने वाढलेली असून वर्षाअखेर ती ₹ २६५.१९ कोटी इतकी झालेली आहे. तर बँकांतर्गत मुदत ठेवींतील गुंतवणूक ही ₹ १३.९० कोटीने कमी झालेली असून वर्षाअखेर ती ₹ १०९.७७ कोटी इतकी झालेली आहे. अहवाल वर्षामध्ये बँकेने कमी व्याजदराच्या मुदत ठेवी मुदतीअंती काढून घेऊन सदर निधी हे कर्ज वितरणाकरिता वापरून बँकेची नफा क्षमता वाढविण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. अहवाल वर्षात सरकारी कर्ज रोखे खरेदी–विक्रीद्वारे बँकेस ₹ ०.७४ कोटी इतका नफा प्राप्त झालेला असून सरकारी कर्ज रोखे खरेदी–विक्रीचे व्यवहार CCIL, National Negotiated Dealing System (NDS) चे सदस्यत्व प्राप्त करून गुंतवणूक व्यवहार सुलभरित्या केले जात आहेत.

**कर्जव्यवहार :**

अहवाल वर्षात कर्जावरील व्याजदरांबाबत तीव्र स्पर्धा असतांना आपल्या बँकेने सुरक्षित व किरकोळ स्वरुपाची कर्जे वितरीत

करून कर्ज व्यवहारात समाधानकारकरित्या वाढ करण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. अहवाल वर्षात अनुत्पादीत कर्ज वसुलीवर अधिक भर देण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. गतवर्षी बँकेने वाटप केलेल्या कर्जापैकी ₹ ५२८.३० कोटी इतके कर्जे येणे बाकी होती. त्यात ₹ ३१.५४ कोटीने घट होऊन अहवाल वर्षाअखेर एकूण कर्ज येणे बाकी ₹ ४९६.७६ कोटी इतकी आहेत. अहवाल वर्षाअखेर बँकेचे येणे असलेल्या कर्जाचे ठेवींशी गुणोत्तर (CD Ratio) ६२.५७% असल्याने बँकेने ठेवीदारांच्या ठेवींचे सुयोग्य व्यवस्थापन केलेले असल्याचे दिसून येते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार आपल्या बँकेने अग्रगण्य घटकांस ५७.४८% तर दुर्बल घटकांस ९.५९% कर्जे वितरीत केलेली आहेत.

**कर्ज थकबाकी व अनुत्पादित कर्जे व्यवस्थापन :**

अहवाल वर्षाअखेर बँकेला येणे असलेल्या कर्जापैकी ९.०८% कर्जे थकीत आहेत. तर एकूण कर्ज रकमेपैकी रु. ७२.७८ कोटी कर्जे ढोबळ अनुत्पादित कर्जे (Gross NPAs) म्हणून वर्गीकृत करण्यात आलेली आहेत. आपल्या बँकेने उत्पादित तसेच अनुत्पादित कर्जांसाठी अतिरिक्त स्वरुपात तरतूदी केलेल्या असल्याने बँकेची निव्वळ अनुत्पादित कर्जे (Net NPAs) ८.९०% इतकी आहेत. अहवाल वर्षात बँकेचे संचालक मंडळ सदस्य. अधिकारी व कर्मचारी वर्गाने कर्ज थकबाकी वसुलीस सर्वोच्च प्राधान्य देत अनुत्पादित कर्ज वाढीवर समाधानकारकरित्या नियंत्रण राखलेले आहे. कर्जदारांना आपल्या कर्जाचे हप्ते नियमित भरणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

**संशयित व बुडीत कर्जांचे निर्लेखन :**

बँकेच्या एकूण १९ जुन्या अनुत्पादित कर्ज खात्यांवरील येणे रकमेपोटी कर्ज वसूलीबाबत बँकेच्या वसूली विभागाद्वारे सर्वतोपरी प्रयत्न करून तसेच कायदेशीर कारवाई करूनही कर्ज वसूल होऊ शकलेली नाहीत. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार अशा अनुत्पादित कर्जाच्या येणे रकमांपोटी १००% तरतूद करण्यात आलेली असून सदर थकीत कर्ज वसुल करण्यासाठी होणारे वसूली खर्च, अन्य प्रशासकीय खर्च यांमध्ये बचत करणे, बँकेचा ताळेबंद स्वच्छ करून तो सत्यस्थितीदर्शक करणे, आर्थिक गुणोत्तरे सुधारणा तसेच करपात्र उत्पन्नानुसार करबचतीचा लाभ घेणे आदी बाबींकरिता बँकेच्या संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे व वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणीत केल्यानुसार अशा अनुत्पादित कर्ज खात्यांवरील येणे शिल्लक रक्कम ₹ १०,३६,०१५.०० व त्यावरील येणे व्याज ₹ ५२,६३,३४६.०० अशी एकूण ₹ ६२,९९,३६१.०० रक्कम सदर कर्जदार यांचेकडून वसुलीबाबतचे सर्व अधिकार अबाधित राखून निर्लेखित करण्याबाबत निर्णयाचे अधिकार बँकेच्या संचालक मंडळास प्रदान करण्याकरिता व मा. वार्षिक सभेने मान्यता देण्याकरिता विनंती करण्यात येत आहे. सदर कर्जे निर्लेखिकरण प्रक्रियेचे स्वरुप हे कर्ज माफ स्वरुपाचे नसून सदर अनुत्पादित कर्जाची पूर्णतः वसूली झाल्याशिवाय कर्जदारांना कर्ज बंद झाल्याचे प्रमाणपत्र (No Dues Certificate) दिले जाणार नसल्याने सदर प्रक्रिया ही केवळ लेखी नोंदीच्या (Accounting Standard) पद्धतीस अधिन राहून करण्यात येत आहे.

**खेळते भांडवल :**

गतवर्षी आपल्या बँकेचे खेळते भांडवल ₹ ९८०.७४ कोटी इतके होते. अहवाल वर्षात त्यात ₹ ८.०७ कोटीने घट होऊन वर्षाअखेर ते ₹ ९७२.६७ कोटी झालेले आहे. अहवाल वर्षातील खेळत्या भांडवलातील घट ही प्रामुख्याने बँकेच्या वितरीत करण्यात आलेल्या कर्जामध्ये वसूलीमुळे झालेली घट आदी बाबींमुळे झालेली असून आगामी कालावधीत बँकेच्या व्यवसाय वाढीकरिता सर्वतोपरी प्रयत्न करून खेळत्या भांडवलामध्ये समाधानकारक वाढ केली जाणार आहे.

**संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांची कर्जे :**

संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना बँकेमार्फत मंजूर करावयाच्या कर्जावर भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्बंध असल्यामुळे अहवाल वर्षात अशी कर्जे वितरीत करण्यात आलेली नाहीत. तथापि, वैधानिक स्वरुपात सादर कराव्या लागणाऱ्या माहितीपत्रात संचालक

मंडळात नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी व त्याचे नातेवाईकांनी बँकेकडून संचालक मंडळाचे निवडणूकीपूर्वी घेतलेली कर्जे संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांची कर्जे वर्षा अखेर येणे म्हणून दाखविणे अभिप्रेत असते. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या दि. ३१/०३/२०२२ अखेर येणे असलेल्या कर्जाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

### संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या ३१ मार्च २०२२ अखेरच्या कर्जाची माहिती

(रु. लाखांत)

| संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक की ज्यांनी बँकेकडून कर्ज घेतलेले आहे त्यांची संख्या | वर्षाच्या सुरूवातीला वाटप केलेल्या कर्जापैकी येणे असलेल्या कर्जाची रक्कम (दि.०१.०४.२०२१) | दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीत वाटप झालेली रक्कम | दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीत वसुल झालेली रक्कम | वर्षाअखेर असलेल्या येणे कर्जाची रक्कम (दि.३१.०३.२०२२) | येणे कर्जापैकी थकबाकी असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| अ) संचालक - ० | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- |
| ब) संचालकांचे नातेवाईक - १ | १०९.१२ | ---- | १०५.४२ | ३.७० | ---- | ---- |
| एकुण रुपये | **१०९.१२** | ---- | **१०५.४२** | **३.७०** | ---- | ---- |

**संचालक मंडळ व समित्या सभा :**

बँकेच्या संचालक मंडळात आर्थिक, सामाजिक, कामगार व औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेले सदस्य असून त्यांच्यात असलेला व्यवसायिक दृष्टीकोन व दुरदर्शीपणा बँकेच्या सर्वांगीण विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत असतो. अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १८ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे. बँकेचे सर्व संचालक सदस्य सभासद, ग्राहक व कर्मचारी वर्गास सदैव मार्गदर्शन करतात व बँकेच्या कामकाजात सहभागी होऊन कामकाजात गतिमानता राखण्याचे प्रयत्न करतात. बँकेतील विविध विभागांचे कामकाज जलदगतीने व सुलभतेने होण्यासाठी संचालक मंडळांतर्गत असलेली कर्ज मंजुरी समिती, कार्यकारी समिती, ऑडीट समिती, वसुली समिती, गुंतवणूक समिती, संगणक समिती, एकरकमी तडजोडीने कर्ज वसुली समिती यांच्या वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या सभांनाही समिती सदस्यांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे.

| अ.क्र. | संचालकांचे नाव | एकूण सभा | संचालक सभा | उपसमित्या सभा | उपस्थिती | उपस्थितीचे शेकडा प्रमाण(%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. राजाराम शंकर ओंबळे | ३६ | १८ | १७ | ३५ | ९७.२२% |
| २. | श्री. भानुदास महादेव जाधव | ३५ | १७ | १६ | ३३ | ९४.०९% |
| ३. | श्री. विक्रम विजयकुमार भिलारे | ४४ | १८ | २२ | ४० | ९०.९१% |
| ४. | श्री. चंद्रकांत रावसाहेब गावडे | ४० | १५ | १५ | ३० | ७५.००% |
| ५. | श्री. प्रकाश जगन्नाथ मस्कर | २५ | १४ | ४ | १८ | ७२.००% |
| ६. | श्री. हणमंत गणपत पवार | ३६ | १८ | १८ | ३६ | १००.००% |
| ७. | श्री. आनंदराव जोतीबा सपकाळ | ३८ | १८ | २० | ३८ | १००.००% |
| ८. | श्री. भरत राजाराम सपकाळ | ३३ | १८ | १५ | ३३ | १००.००% |
| ९. | श्री. संतोष रामचंद्र कळंबे | २८ | १४ | ०७ | २१ | ७५.००% |
| १०. | श्री. बजरंग कोंडीबा संकपाळ | ४३ | १० | १९ | २९ | ६७.४४% |
| ११. | श्री. शिवाजी श्रीपती नवसरे | २९ | १८ | ११ | २९ | १००.००% |
| १२. | श्री. मोहन ज्ञानदेव मानकुमरे (२४/०४/२०२१ पर्यंत) | २ | १ | ० | १ | ५०.०% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३. | श्री. शांताराम श्रीपती आंग्रे | ३६ | १८ | १८ | ३६ | १००.००% |
| १४. | श्री. श्रीरंग भागू सपकाळ | ३० | १८ | १२ | ३० | १००.००% |
| १५. | श्री. प्रकाश उर्फ चंद्रकांत धोंडिराम कोकरे | २४ | १६ | ६ | २२ | ९१.६७% |
| १६. | सौ. पवित्रा राजाराम परामणे | २८ | १७ | १० | २७ | ९६.४३% |
| १७. | सौ. अस्मिता विजय धनावडे | ५६ | १४ | ३७ | ५१ | ९१.०७% |
| १८. | ॲड. शिवाजीराव साहेबराव मर्ढेकर | ३९ | १४ | २० | ३४ | ८७.१८% |
| १९. | श्री. चंद्रकांत सुदाम पवार | २८ | १६ | १० | २६ | ९२.८६% |
| २०. | श्री. प्रविण वसंत शिंदे | १७ | १७ | ० | १७ | १००.००% |
| २१ | श्री अशोक रामचंद चव्हाण | १७ | १७ | ० | १७ | १००.००% |

**२०२२–२३ ते २०२६–२७ या कालावधी करिता संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक** :

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी जाहिर केलेल्या बँकेच्या संचालक मंडळाच्या माहे २०२२–२३ ते २०२६–२७ या कालावधीचे निवडणूकीकरिता **श्री. एस. बी. मते, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ई–विभाग, मुंबई** यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे अधिपत्याखाली बँकेच्या संचालक मंडळाची अविरोध निवडणूक पार पडलेली आहे. सदर निवडणूक प्रक्रियेअंतर्गत बँकेच्या सभासदांमधून खालीलसभासद दि. १३.०७.२०२२ पासून बँकेच्या संचालक पदी अविरोध निवडून आलेले आहेत.

**श्री विक्रम विजयकुमार भिलारे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.चंद्रकांत तानाजी दळवी**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.चंद्रकांत रावसाहेब गावडे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.प्रकाश जगन्नाथ मस्कर**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.योगेशराव हरिभाऊ गोळे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.अरूण बाबुराव सुर्वे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.संतोष रामचंद्र कळंबे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.बाळासाहेब तुकाराम भालेघरे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.अजित काशीनाथ कळंबे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.विश्वनाथ ज्ञानदेव धनावडे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.रामचंद्र विठ्ठल चिकणे**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.गणेश नामदेव भोसले**
सर्वसाधारण मतदारसंघ

**श्री.प्रकाश उर्फ चंद्रकांत धोंडीराम कोकरे**
भटक्या विमुक्त जमाती मतदारसंघ

**श्री.विजय दगडु कदम**
अनुसुचित जाती जमाती मतदारसंघ

**श्री.चंद्रकांत नामदेव गवळी**
इतर मागास वर्ग मतदार संघ

**सौ.जयश्री वसंतराव मानकुमरे**
महिला राखीव मतदार संघ

**सौ.उमिता शिवाजी रांजणे**
महिला राखीव मतदार संघ

अविरोध निवडून आलेल्या सर्व संचालक सदस्यांची नोंद घेण्याकरिता विनंती करण्यात येत आहे.

**अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांची निवड** :

बँकेच्या संचालक मंडळाच्या माहे २०२२–२३ ते २०२६–२७ या कालावधी करिता झालेल्या अविरोध निवडणूकीनंतर दि. २५ जुलै,२०२२ रोजी घेण्यात आलेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांचे निवडणूकीत बँकेचे संचालक **श्री. विक्रम विजयकुमार भिलारे** यांची **अध्यक्ष**

पदी तर बँकेचे संचालक **श्री. चंद्रकांत तानाजी दळवी** यांची **उपाध्यक्ष** पदी सर्व सहमतीने बिनविरोध निवड करण्यात आलेली आहे.

अहवाल वर्षात कार्यरत असलेले बँकेचे **अध्यक्ष श्री. राजाराम शंकर ओंबळे** आणि **उपाध्यक्ष श्री. भानुदास महादेव जाधव** यांनी आपल्या कार्यकाळात बँकेस प्रदान केलेल्या योगदानाबद्दल बँक त्यांची ऋणी आहे.

**बँक व्यवस्थापन मंडळ** (Board of Management) :

भारतीय रिझर्व्ह बँकेचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ चे परिपत्रक No. RBI/२०१९-२०/१२८ DoR (PCB) BPD.Cir. No. ८/१२.०५.००२/२०१९-२० आणि बँकेच्या उपविधीतील सुधारीत कलम क्र. ५० B नुसार दि. २४.०६.२०२१ पासून बँकेच्या व्यवस्थापन मंडळाची (Board of Management) रचना करण्यात आलेली होती. सदर व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यपदी बँकेच्या संचालक मंडळ सदस्यांमधून १. श्री. आनंदराव जोतिबा सपकाळ,चेअरमन, बँक व्यवस्थापन मंडळ, २.सी.ए.सौ.अस्मिता विजय धनावडे व ३. श्री. भानुदास महादेव जाधव  यांची तर निर्देशित इतर विषयातील विशेष ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असलेले १. श्री. विजयराव केशव मोकाशी, २. श्री. वसंत जिजाबा तरडे व ३. सी.ए. श्री.यशराज मोहन मानकुमरे हे कार्यरत होते. सदर व्यवस्थापन मंडळ सदस्यांचा सहकार व बँकिंग क्षेत्रातील अनुभव व योगदान हे बँकेच्या विकासाच्या दृष्टिने मोलाचा ठरलेले आहे. अहवाल वर्षात बँक व्यवस्थापन मंडळाच्या ९ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना सदस्यांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे. बँकेच्या संचालक मंडळाचे कार्यकाळाबरोबर बँक व्यवस्थापन मंडळाचाही कार्यकाळ संपूष्टात आलेला असून व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी आपल्या कार्यकाळात बँकेच्या विकासाकरिता प्रदान केलेल्या योगदानाबद्दल बँक त्यांची ऋणी आहे.

**कर्मचारी प्रतिनिधी यांची फेरनियुक्ती** :

बँकेचे युनिटचे कर्मचारी प्रतिनिधी असलेले कर्मचारी श्री. प्रविण वसंत शिंदे आणि श्री. अशोक रामचंद्र चव्हाण यांची को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई यांचे आदेशानुसार दि. ०५/०८/२०२२ पासून बँकेच्या युनिटचे कर्मचारी प्रतिनिधी म्हणून फेरनियुक्ती करण्यात आलेली आहे.

**कर्मचारी वृंद व प्रशिक्षण** :

बँकेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमध्ये कर्मचारी वर्गाचा सहभाग उल्लेखनिय असा राहिलेला आहे. बँक व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांचेत कायमस्वरुपी सलोख्याचे व सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित आहेत. अहवाल वर्षात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे कुशल तसेच प्रशिक्षित कर्मचारी वर्गाचे माध्यमातून बँकेने ग्राहकाभिमुख सेवा-सुविधा प्रदान करण्याचे प्रयत्न साधण्यात आलेले आहेत. अहवाल वर्षाअखेर बँकेच्या सेवेत सर्व श्रेणीचे २०४ कर्मचारी कार्यरत आहेत. बँकेच्या कामकाजातील व्यावसायिकता वाढविण्यासाठी व नवीन आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी अहवाल वर्षात बँकेने रिझर्व्ह बँक (CAB) पुणे, यशदा-पुणे, सहकार खाते, बॅक्स असोसिएशन यांनी आयोजित केलेल्या विविध कार्यशाळांना विविध श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना पाठविले होते.

**मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्याने नियुक्ती** :

बँकिंग क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असलेले **श्री. ईश्वरदास दयाराम लालवाणी** यांची दि. ०६.०६.२०२२ पासून बँकेच्या 'मुख्य कार्यकारी अधिकारी' पदावर करार तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. आगामी कालावधीत नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अनुभवाचा बँकेस अधिकाधिक उपयोग होणार आहे.

त्याचप्रमाणे बँकेच्या सेवेत सरव्यवस्थापक पदी कार्यरत असलेले श्री. दत्ता नारायण कळंबे  दि. ३१ मार्च, २०२२ रोजी तर करार तत्वावर मुख्य सरव्यवस्थापक पदी नियुक्तीवर असलेले, श्री. तानाजी नारायणराव पवार हे दि. ३१ जुलै २०२२ रोजी बँकेच्या सेवेतून

सेवानिवृत्त झालेले आहेत. बँकेच्या सेवेत असलेल्या सरव्यवस्थापक आणि मुख्य सरव्यवस्थापक यांनी आपल्या सेवा कार्यकाळात बँकेस दिलेल्या योगदानाबद्दल बँक त्यांची ऋणी आहे.

**भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत तपासणी :**

बँकिंग नियंत्रण अधिनियम, १९४९ च्या कलम ३५ अन्वये (सहकारी बँकांना लागू असणारा) भारतीय रिझर्व्ह बँक, बँका पर्यवेक्षण विभागामार्फत आपल्या बँकेच्या माहे १ एप्रिल, २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या द्वैवार्षिक कालावधीच्या तपासणीचे काम तपासणी अधिकारी **श्रीमती अनिता मेहता**, उपसरव्यवस्थापक व त्यांचे सहाय्यक अधिकारी श्री. कुमार अभिषेक यांच्याद्वारे चालू आहे.

**वैधानिक लेखा परिक्षण :**

वैधानिक लेखापरिक्षकांचे नियुक्तीबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सुधारीत मार्गदर्शक निर्देशांनुसार बँकेच्या सन २०२१–२२ च्या वैधानिक लेखा परिक्षणासाठी अधिकृत सनदी लेखापालांचे सुचीमधून **मे. यु जी देवी अँड कंपनी** या चार्टर्ड अकौंटंट फर्मची भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्व मान्यतेने नेमणूक करण्यात आलेली होती. मा. वैधानिक लेखा परिक्षकांनी बँकेचे लेखापरिक्षणाचे काम पूर्ण करून बँकेस अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवाल आपल्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला असून मा. वैधानिक लेखा परिक्षकांनी सन २०२१–२२ या आर्थिक वर्षासाठी आपल्या बँकेस **'ब ऑडीट वर्ग '** प्रदान केलेला आहे.

**समावर्ती लेखा परिक्षण / टॅक्स ऑडिट व माहिती तंत्रज्ञान लेखापरिक्षण :**

सन २०२१–२२ या वर्षाच्या बँकेच्या समावर्ती लेखा परिक्षणाचे (Concurrent Audit) काम मे. वर्षा काळे अँड कंपनी, मे. एम के टी एस् के अँड कं., मे अभिजीत शिंदे अँड कं., मे. जी एस् इंगळे अँड कं., मे. अमित वर्मा अँड कंपनी, मे. अमित निकम अँड असोसिएटस्, मे. विवेक शहा अँड कं., व टॅक्स ऑडीटचे काम मे. विंदू अँड असोसिएटस्, जी एस टी ऑडीटचे काम मे. पायल गाडा अँड असोसिएटस्, माहिती तंत्रज्ञान लेखापरिक्षणाचे (IS Audit) काम मे. मार्क अँड असोसिएटस् व स्टॉक ऑडिटचे काम मे. बी आर सावंत अँड कं., मे. नितीन दळवी अँड कंपनी., मे. तेजस नाडकर्णी अँड असोसिएटस् या चार्टर्ड अकौंटंट फर्मस्नी पूर्ण केलेले आहे. विविध स्वरुपाचे लेखा परिक्षण करणाऱ्या सर्व फर्मसनी आपल्या बँकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केलेले असून अहवालाद्वारे बँकेस उपयुक्त स्वरुपाच्या सूचना व मार्गदर्शन केलेले आहे.

**नफा – तोटा खाते :**

आपल्या बँकेस माहे ३१ मार्च २०२२ या वर्षाअखेर **₹** १०,२८,५६,७६३.१२ इतका व्यवसायिक तोटा (Operating Loss) झालेला आहे. बँकेने आर्थिक वर्ष २०२१–२२ च्या निव्वळ नफ्याचे केलेल्या विभागणीद्वारे गुंतवणूक चढ–उतार निधी अंतर्गत शिल्लक असलेले अतिरिक्त **₹** २०,२५,३४१.९२ निधी नफा–तोटा खात्यात परावर्तीत केल्याने माहे ३१ मार्च २०२२ या वर्षाअखेर **₹.** १०,०८,३१,४२१.२० इतका निव्वळ तोटा (Net Loss) ताळेबंद पत्रकामध्ये वर्ग करण्यात आलेला आहे. सदर नफा–तोटा खात्याची या वार्षिक सर्वसाधारण सभेने नोंद घेण्याकरिता संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजली :**

अहवाल वर्षात बँकेचे संस्थापक संचालक आणि मा.चेअरमन **यशवंतराव राजाराम देशमुख** यांचे दुख:द निधन झालेले आहे. त्याप्रमाणे देशाचे रक्षण करताना जम्मु काश्मिर येथे दहशतवाद्यांशी लढताना शहिद झालेले जावली तालुक्यातील बामणोली तर्फे कुडाळ गावचे शुर जवान **कै. प्रथमेश संजय पवार**, महाराष्ट्राची मदर तेरेसा अशी ओळख असणाऱ्या अनाथांच्या माई **कै. सिंधूताई सपकाळ,** भारतरत्न

किताब प्राप्त झालेल्या गान सम्राज्ञी **कै. लता मंगेशकर (लतादीदी)** यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्याप्रमाणे अहवाल वर्षात पंचतत्वात विलीन झालेले थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, चित्रपट व नाट्य क्षेत्रातील नामवंत कलाकार, शिक्षण तज्ञ, बँकिंग व आर्थिक क्षेत्रातील प्रतिभावंत व्यक्ती, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. क्षेत्रातील ख्याती प्राप्त झालेले व लोकप्रिय व्यक्ती, बँकेचे ज्ञात-अज्ञात सभासद, खातेदार, हितचिंतक, संचालक व कर्मचारी वर्गाचे नातेवाईक यांनाही काळाने आपल्यातून हिरावून नेलेले आहे. त्या सर्वांच्या कुटूंबियांच्या दु:खात आपला दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक परिवार सहभागी असून दिवंगतांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात येत आहे.

**अभिनंदनीय निवड :**

अहवाल वर्षामध्ये लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधान परिषदेवर निवड झालेले खासदार तसेच आमदार, स्थानीक स्वराज्य संस्था व अन्य महत्वाच्या पदावर निवड झालेले पदाधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षा (MPSC), केंद्रिय लोकसेवा आयोग परिक्षा (UPSC) यामध्ये पोलिस उपनिरिक्षक, भारतीय पोलिस सेवा इत्यादी पदांकरिता परिक्षेत उतीर्ण झालेले विद्यार्थी, जिल्ह्यातील/तालुक्यातील सहकारी साखर कारखाने, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीत निवडून आलेले सन्माननीय संचालक, निवड झालेले अध्यक्ष व उपाध्यक्ष या सर्वांचा बँकेला अभिमान आहे. त्याचप्रमाणे विविध सामाजीक, शैक्षणिक व क्रिडा क्षेत्रात बँकेचे खातेदार, सभासद व हितचिंतक यांच्या विविध पदांवर निवडी झालेल्या आहेत. या सर्वांचे बँकेच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहेत.

**आभार आणि ऋणनिर्देश :**

**मा. श्री.शरदचंद्रजी पवार**
माजी केंद्रीय कृषी आणि अन्न प्रक्रिया मंत्री

**मा. ना. श्री. एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. ना. देवेंद्रजी फडणवीस**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. ना. श्री. अजितदादा पवार**
विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र राज्य विधानसभा

**मा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले**
खासदार- राज्यसभा
संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

**मा. श्री. श्रीनिवास पाटील**
खासदार- सातारा

**मा. श्री. आनंदराव अडसूळ**
मा.केंद्रीय अर्थराज्य मंत्री, मा.खासदार - अमरावती
अध्यक्ष - को.ऑप.बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई

**मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर**
सभापती-विधान परिषद, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. शशिकांत शिंदे**
आमदार-विधानपरिषद व
माजी जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे) महाराष्ट्र राज्य

**मा. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले**
आमदार-सातारा-जावली,
अध्यक्ष-सातारा जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि.

**मा. श्री. मकरंद पाटील (आबा)**
आमदार-वाई-महाबळेश्वर-खंडाळा

**मा. श्री. नरेंद्र पाटील**
सरचिटणीस-माथाडी कामगार युनियन,
मा.अध्यक्ष-आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ,महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. सदाशिवभाऊ सपकाळ**
मा. आमदार-जावली

**मा. श्री. वसंतराव मानकुमरे**
माजी उपाध्यक्ष-सातारा जिल्हा परिषद
माजी संचालक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक

**मा. श्री. नितीन लक्ष्मणराव पाटील (काका)**
अध्यक्ष- सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

**मा. श्री. राजेंद्रशेठ राजपुरे**
संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

**मा. श्री. ज्ञानदेव रांजणे**
संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

**मा. श्री. अमितदादा कदम**
माजी सभापती अर्थ व शिक्षण समिती सातारा जिल्हा परिषद